महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक कार्यालय बीड
जिल्हा शासकिय रुग्णालयाजवळ बार्शी रोड बीड -४३११२२
फोन : ०४२४२-२३३०९४, फॅक्स : ०२४४२-२२१३३३ ई-मेल : sp.beed@mahapolice.gov.in



जा.क्र.आस्था-प्रलि/ पोलीस शिपाई भरती- २०२४-२५/२०२६/ 5224 बीड, दिनांक ०८/०७/२०२६

प्रतिक्षा यादीवरील उमेदवार यांनी कागदपत्रे पडताळणी साठी हजर राहणे बाबत.

oo

- बीड जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांच्या १७४ रिक्त पदांसाठी दिनांक ११/०२/२०२६ ते दिनांक १८/०२/२०२६ पावेतो कवायत मैदान, पोलीस मुख्यालय बीड येथे मैदानी चाचणी घेण्यांत आलेली आहे. मैदानी चाचणी मध्ये उमेदवारंनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे जाहिरातीमधील रिक्त पदाचे १:१० प्रमाणात लेखी परीक्षासाठी पात्र ठरलेल्या उमेदवार यांची लेखी परीक्षा दिनांक १५/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते १२.३० दरम्यान आदित्य इंजिनियरिंग कॉलेज, तेलगांव नाका, ता.जि.बीड येथे घेण्यांत आली. त्यानंतर अंतिम उत्तर तालिका प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.
- अंतिम उत्तर तालिका आधारे उमदेवार यांना प्राप्त झालेले एकत्रित गुण एनसीसी क प्रमाणपत्र आधारे पाच अधिक गुण देण्यांत येवून या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र. प्रलि-आस्था/पो. भरती/तात्पुरती निवड यादी/२०२६ बीड दिनांक २६/०३/२०२६ अन्वये पोलीस भरती सन २०२४-२०२५ करीता तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.
- या कार्यालयाचे पत्र क्रमांक आस्था-प्रलि/ मुळ कागदपत्रे/यादी/२०२६/२२३८ बीड दिनांक २८/०३/२०२६ अन्वये तात्पुरती निवड यादी मध्ये समाविष्ट असलेल्या उमेदवार यांची दिनांक ३०/०३/२०२६ ते दिनांक ०१/०४/२०२६ रोजी पावेतो मुळ कागदपत्रे पडताळणी पोलीस अधीक्षक, कार्यालय बीड येथे करण्यांत आलेली आहे.
- दिनांक ३०/०३/२०२६ ते दिनांक ०१/०४/२०२६ रोजी पावेतो मुळ कागदपत्रे पडताळणी मध्ये खालील उमेदवार अपात्र ठरलेले आहेत. त्यांचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	तात्पुरती निवड यादी मध्ये समाविष्ठ असलेल्या उमेदवार यांचे नाव	सामाजिक व समांतर आरक्षण निवड प्रवर्ग	अपात्रचे कारण	प्रतिक्षा यादीवरील उमदेवार	सामाजिक व समांतर आरक्षण
०१	०२	०३	०४	०५	०६
०१	वैभव बळीराम देवकुले, चेस्ट क्रमांक ११०१	खुला - अंशकालीन	अंशकालीन प्रमाणपत्र उपलब्ध नाही	गणेश पोपट सानप, चेस्ट क्रमांक ३४४७	खुला-सर्वसाधारण
०२	शुभम नामदेव लबडे, चेस्ट क्रमांक २९९७	इमाव-माजी सैनिक अवलंबित	माजी सैनिक अवलंबित प्रमाणपत्र अवैध	नवनाथ जगन्नाथ जाधव, चेस्ट क्रमांक ३७२०	इमाव-माजी सैनिक
०३	गंगाभिषण उमाशंकर शिंदे चेस्ट क्रमांक २६२९	SEBC- पोलीस पाल्य	नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र वैध नाही	अमित उध्दवराव सावंत चेस्ट क्रमांक ५३२	SEBC- पोलीस पाल्य

०४	साजेदा निसार शेख, चेस्ट क्रमांक ५१५०	EWS-Female Reservation	वैयक्तीक कारणास्तव भरती प्रक्रिया मधून अर्ज मागे घेतला आहे.	अंजुम बाशाभाई शेख, चेस्ट क्रमांक ३८९०	EWS-Female Reservation
५	मोहम्मद रफियोद्दीन शेख चेस्ट क्रमांक ३४०	EWS-पोलीस पाल्य	पोलीस पाल्य प्रमाणपत्र अवैध	समीर अहमद शेख चेस्ट क्रमांक १६८८	EWS-पोलीस पाल्य

- वर नमुद प्रमाणे एकुण ०५ उमेदवार यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे पोलीस भरती सन २०२४-२०२५ करीत अपात्र घोषित करण्यांत येत आहे. त्यांचे ऐवजी प्रतिक्षा यादीवरील वरील रकाना क्रमांक ०५ मधील उमेदवार यांनी मुळ कागदपत्रे पडताळणी साठी दि. १०/०७/२०२६ रोजी १६.०० वाजता पोलीस अधीक्षक, कार्यालय बीड येथे हजर राहावे.
- उमेदवार तुळशीराम विठ्ठल महानोर यांनी अंतिम उत्तर तालिका मध्ये बदल होणे बाबत मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे मुळ अर्ज क्रमांक ३०६/२०२६ अन्वये दाखल केले होते. त्यामध्ये मा. न्यायालयाचे दिनांक १८/०४/२०२६ रोजीचे आदेशान्वये सदरचा मुळ अर्ज फेटाळला आहे. त्याबाबत उमेदवार यांनी मा. उच्च न्यायालाय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे रिट पीटीशन क्रमांक ४५७५/२०२६ अन्वये दाखल केलेले आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक २७/०४/२०२६ रोजीचे आदेशान्वये *या याचिकेच्या निर्णयाच्या अधीन राहूनच नियुक्ती केली जाईल* असे आदेश दिलेले आहेत.
- मा. उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी रिट पीटीशन क्रमांक ४५७५/२०२६ मध्ये दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून सदर प्रतिक्षा यादीवरील उमदेवार यांना कागदपत्रे पडताळणी साठी बोलविण्यांत येत आहे.
- उमेदवार यांनी सादर केलेली सर्व मुळ कागदपत्रे, समांतर आरक्षण बाबतची कागदपत्रे, समांतर आरक्षण पडताळणी अहवाल याबाबत प्रतिकूल अहवाल प्राप्त झाल्यास अथवा उमदेवार यांनी सादर केलेली कागदपत्रे वैध नसल्यास उमदेवार यांची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यांत येईल.
- भरती प्रक्रिया दरम्यान आवश्यक ते बदल करण्याचे / निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळ यांनी राखून ठेवलेले आहेत.
- याबाबत कोणत्याही उमेदवार यांना कसल्याही प्रकारचे आक्षेप असल्यास त्यांनी त्याबाबत योग्य पुराव्यासह त्यांचे आक्षेप दिनांक 10/07/2026 रोजी सकाळी 11.00 वा. पावेतो या कार्यालयाचे ईमेल sp.beed@mahapolice.gov.in यावर पाठवावेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही आक्षेप बाबत कसल्याही प्रकारचा विचार करण्यांत येणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक ०८/०७/२०२६.
ठिकाण :- बीड.

(नवनीत काँवत)
पोलीस अधीक्षक, बीड तथा
अध्यक्ष पोलीस भरती निवड मंडळ